Postal Reg. No. RTR/013/2021-2023

कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक

# रत्नागिरी टाइम्स

रत्नागिरी

गुरुवार, दि. ४ ऑगस्ट २०२२

## मराठा मंदिर ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेत सुयश

रत्नागिरी, ३ ऑगस्ट (वार्ताहर) : मराठा मंदिर संचलित, मराठा मंदिर ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

गोरेज एज्युकेशन फाऊंडेशनमार्फत २७ फेब्रुवारी २०२२ रोजी घेण्यात आलेल्या ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत शाळेतील ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यासाठी इयत्ता दुसरीमधील अंश तोडणकर, अमान मालिम, इयत्ता पाचवीमधील मानस चव्हाण व इयत्ता सहावीमधील इमॅक्लस नियाल हे ४ विद्यार्थी सहभाग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले तर इयत्ता दुसरीच्या त्रिशा खातू हिने कांस्यपदक पटकावले आहे. तसेच इयत्ता तिसरीच्या वरूणिका बोडके हिने संपूर्ण भारतात ९५ वा क्रमांक प्राप्त करून सुवर्णपदक मिळवले.

या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक व संस्था यांना दिले आहे. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता विश्वकर्मा व शाळेच्या समन्वयिका मनुश्री राणे यांनी सर्व पालक, शिक्षक व संस्था पदाधिकारी यांच्यामार्फत त्यांचे कौतुक केले.



ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिपमध्ये यश मिळवलेले मराठा मंदिर संचलित ग्लोबल स्कूलचे विद्यार्थी, सोबत शिक्षक.